ePaper

# अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अटक



| वर्ष - 6 | अंक - 346 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- शिरुरमध्ये पुन्हा राजकीय भूकंप?
- महाराष्ट्र केसरी बैलगाडा शर्यत: अखेर वाद मिटला!
- फडणवीस फडतूस, गृहमंत्री नव्हे हे तर गुंडमंत्री

www.mahaenews.com | बुधवार दि. 5, एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुख्यमंत्र्यांचा भूमिपुत्रांना शब्द!

## 12.5% परताव्याचा शासन निर्णय 8 दिवसांत काढणार; शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील भूसंपादनामुळे बांधित झालेल्या भूमिपुत्रांचा प्रश्न सुटला आहे. 1972 ते 1983 दरम्यान जमिनी संपादित झालेल्या उर्वरित 106 शेतक-यांना सव्वासहा टक्के जमीन आणि 2 चटई क्षेत्र एवढा निर्देशांक (एफएसआय) दिला जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय पुढील आठ दिवसात काढला जाईल, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**

खासदार श्रीरंग बारणे यांनी प्राधिकरणातील बाधित नागरिकांसह मुख्यमंत्री शिंदे यांची मुंबईत भेट घेतली. अनंता काळभोर, राजेंद्र लक्ष्मण काळभोर, अ‍ॅड. राजेंद्र काळभोर आदी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, प्राधिकरणाची जागा दोन टप्यात संपादित केली होती. 1972 ते 1983 आणि 1984 नंतर दुसरा टप्पा संपादित झाला.

1984 नंतरच्या बाधित शेतक-यांना मोबादला मिळाला. पण, 1972 ते 1983 दरम्यान जमिनी संपादित झालेल्या बाधित शेतक-यांना त्याता कुठलाही मोबादला मिळाला नाही. या शेतक-यांना मोबदला देण्यात यावा.

### राज्यातील भाजप-शिवसेना महायुती सरकारचा आणखी एक मोठा निर्णय



### शासन आदेश काढण्याची प्रक्रिया सुरु

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाचे सचिव भूषण गगराणी यांना बोलावून घेतले. त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकी दरम्यान साडेबारा टक्के परताव्याचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन मी दिले होते. सव्वासहा टक्के जमीन आणि 2 चटई क्षेत्र एवढा निर्देशांक (एफएसआय) देण्यात येणार आहे.

» त्यासाठी जागा आरक्षित ठेवली आहे. परताव्याचा प्रश्न सुटला आहे. याबाबतचा शासन आदेश काढण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. येत्या आठ दिवसात शासन आदेश निघेल अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

# नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांच्या विशेष मोहिमेत ४७१ गुन्हे !

## विरुद्ध दिशेने प्रवास करणारे, ट्रिपल सीट वाहन चालविणाऱ्यांना दणका: वाहतूक पोलीसांची कठोर भूमिका

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने दि.२४ ते ३१ मार्च या कालावधीत विशेष मोहिम राबवली. या मोहिमेत विरुद्ध दिशेने प्रवास करणारे, ट्रिपल सीट वाहन चालविणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ४७१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

सहायक पोलिस आयुक्त सतीश माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव ही औद्योगिक क्षेत्रे, हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी क्षेत्रे आहेत. या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे इथे काम करणाऱ्या कामगारांमध्ये दुचाकी, चारचाकी वाहनांचा वापरही मोठ्या प्रमाणात होतो.

रस्त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करून विरुद्ध दिशेने तसेच ट्रिपल सीट वाहने चालविल्यामुळे अपघाताच्या संख्येत वाढ होत आहे. या अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी आयुक्तालयाच्या हद्दीत दि.२४ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली.



### नागरिकांनी नियमांचे पालन करावे

» या मोहिमेत विरुद्ध दिशेने वाहन चालवणारे ३१३ वाहन चालक तसेच ट्रिपल सीट वाहन चालवणारे १५८ वाहनचालक यांच्यावर भारतीय दंड संहिता २७९ नुसार एकूण ४७१ गुन्हे दाखल करण्यात आले. यापुढील काळात देखील अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन सहायक आयुक्त सतीश माने यांनी केले आहे.



# शिरुरमध्ये पुन्हा राजकीय भूकंप?

## चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्यामुळे आढळरावांचे वाढले टेंशन

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून अमोल कोल्हे हे भाजपमध्ये जाणार अशा चर्चांना उधाण आले आहे. मात्र, आता खुद्द चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या विधानामुळे त्याची पुन्हा चर्चा सुरु झाली आहे. त्या मुलाखतीमध्ये त्यांनी कोल्हे यांच्या विषयी भाष्य केले.**



या मुलाखतीत पाटील म्हणाले, "भाजपसोबत आलेल्या शिंदे गटाला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निर्णयांचा फायदा होणार आहे. आता मात्र, महाराष्ट्रातील परिस्थिती कधी नव्हे इतकी अस्थिर झाली आहे. ही स्थिती सतत बदलत आहे. त्यामुळे जागावाटपबाबत आत्ताच काही निर्णय घेता येणार नाही."

जागावाटपाच्या चर्चेत त्यांनी शिरुरच्या जागेबद्दलही मत व्यक्त केले. या वेळी त्यांनी खासदार कोल्हे यांच्या भाजप (BJP) प्रवेशाबाबत म्हणाले, "लोकसभा निवडणूक प्रक्रिया डिसेंबर-जानेवारी महिन्यात सुरू होईल. त्यानंतर राज्यातील विधानसभा निवडणूक होईल. राज्यातील राजकीय स्थिती पाहता शिरुर लोकसभेच्या जागेबाबत आत्ताच कसे ठरवणार? समजा उदाहरण म्हणून कोल्हेंना वाटले की आपण भाजपमध्ये जावे, तर त्यांनी शिंदे गट का भाजपकडून निवडणूक लढवायची ते त्यांना ठरवावे लागेल."

"अमोल कोल्हे यांना वाटू शकत की आपण भाजपमध्ये जावे, अशा वेळी आढळराव यांची समजूत घालावी लागेल." असे विधान पाटील यांनी केल्यामुळे आढळरावांच्या उमेदवारीवर टांगती तलवार आहे. आढळराव पाटील ठाकरेंना सोडून शिंदे गटात गेल्यानंतरही त्यांची लोकसभा निवडणूक लढण्याची इच्छ पूर्ण होणार की नाही, या विषयी संभ्रम आहे. पाटील यांनी केलेल्या सूचक विधानामुळे शिरुरमध्ये राजकीय घडामोडी घडणार का? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मात्र, पाटील यांच्या वक्तव्यामुळे आढळराव पाटील यांचे नक्कीच टेन्शन वाढणार, असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, पक्ष बदलाबाबत खासदार कोल्हे यांनीच संदिग्धता निर्माण केलेली होती. ते म्हणाले होते की, "मी शेतकऱ्याचा पोरगा आहे. एक गोष्ट पक्की ठाऊक आहे की शेतकरी उगाच औत खांद्यावर घेऊन हिंडत नाही.

### कोल्हे भाजपकडून की शिवसेनेकडून लढणार?

» जागावाटपाच्या चर्चेत त्यांनी शिरुरच्या जागेबद्दलही मत व्यक्त केले. या वेळी त्यांनी खासदार कोल्हे यांच्या भाजप (BJP) प्रवेशाबाबत म्हणाले, "लोकसभा निवडणूक प्रक्रिया डिसेंबर-जानेवारी महिन्यात सुरू होईल. त्यानंतर राज्यातील विधानसभा निवडणूक होईल. राज्यातील राजकीय स्थिती पाहता शिरुर लोकसभेच्या जागेबाबत आत्ताच कसे ठरवणार? समजा उदाहरण म्हणून कोल्हेंना वाटले की आपण भाजपमध्ये जावे, तर त्यांनी शिंदे गट का भाजपकडून निवडणूक लढवायची ते त्यांना ठरवावे लागेल.

# अनुदानापायी कांदा कवडीमोल!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

### 25 पैसे किलो दराने विक्री करण्याची वेळ; सरकारच्या निर्णयाचा व्यापाऱ्यांनाच लाभ

राज्य सरकारने ३५० रुपयांचे अनुदान केवळ ३१ मार्चअखेपर्यंत विक्री होणाऱ्या कांद्यालाच मिळेल, असे २७ मार्च रोजी शासकीय आदेशाद्वारे जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठय़ा प्रमाणावर विक्रीसाठी आणलेला कांदा व्यापाऱ्यांनी अक्षरश: कवडीमोल किमतीने म्हणजे २५ पैसे प्रति किलो दराने खरेदी केल्याचे उघड झाले आहे.राज्यात कांदा दर कोसळल्यामुळे ऐन अर्थसंकल्पीय अधिवेशनात कांद्याला अनुदान देण्याची घोषणा राज्य सरकारला करावी लागली. त्याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारने २७ मार्च रोजी प्रसिद्ध केला. मात्र, बाजारात आणला. त्याचा परिणाम म्हणून मागणी कमी असतानाच्या काळात आवक प्रचंड वाढली. या स्थितीचा फायदा व्यापाऱ्यांनी उठवला आणि शेतकऱ्यांची अडवणूक करून केवळ २५ पैसे प्रति किलो दराने कांदा खरेदी केला. हे प्रकार नाशिक जिल्ह्यात सिन्नर, सटाणा, नांदगाव, उमराणे, देवळामध्ये घडले आहेत.

**३१ मार्च रोजीची बाजार समित्यांमधील स्थिती**

३१ मार्च रोजी नांदगाव बाजार समितीत ५६,८२७ क्विंटल कांद्याची आवक झाली. किमान दर २५ रुपये, तर कमाल दर ८५० रुपये मिळाला.



# पुणे जिल्हा वार्षिक योजनेचा १०० टक्के निधी खर्च

## आगामी वर्षाचा आराखडा 1005 कोटींचा; 130 कोटींची भरीव वाढ

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जिल्ह्याने गेल्या आर्थिक वर्षात १०० टक्के निधी खर्चाचे उद्दिष्ट गाठले असून, याद्वारे जिल्ह्यातील अनेक विकासाची कामे मार्गी लागणार आहेत. सन २०२३-२४ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण योजनेच्या विकास आराखड्यासाठी गतवर्षापेक्षा १३० कोटींची भरीव वाढ मिळविण्यात आली असून आता हा आराखडा १००५ कोटी रुपयांचा असणार आहे.**

ग्रामीण रस्त्यांसाठी ९३ कोटी रुपये खर्च होणार असून, याद्वारे २०० कि.मी.च्या ग्रामीण रस्त्यांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे. त्यासोबतच ४१ कोटी ५२ लाख रुपये खर्चाच्या १०० किलोमीटर इतर जिल्हा मार्गाचेही नियोजन आहे.ग्रामीण भागातील सुविधांवरही लक्ष देण्यात आले असून जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकरिता २३६ कोटींपेक्षा अधिकचा निधी हा ग्रामपंचायत क्षेत्रातील अंतर्गत रस्ते स्मशानभूमी सुधारणा, घाट सुधारणा, गटर बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम आदी कामांकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी १७ नगरपालिका/नगरपंचायतींना १०० कोटींचा निधी देण्यात आला आहे.

लघू पाटबंधारे व कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांसाठी २५ कोटी रुपये देण्यात आल्याने ग्रामीण भागातील सिंचनासाठी त्याचा लाभ होणार आहे. अल्पमुदत पीक कर्ज घेऊन मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ६० हजार २५४ शेतकऱ्यांसाठी १२ कोटी ९१ लाख रुपये देण्यात आले.

ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या उत्तम सुविधा मिळाव्यात याद्दष्टीने जिल्हापरिषद शाळांच्या पायाभूत सुविधांकरिता ३६ कोटी ५० लाख रुपये, जिल्हा परिषद शाळेतील संगणक प्रयोग शाळा, डिजिटल टिचिंग डिव्हाईस, डिजिटल वर्ग खोली यासाठी ४ कोटी ५० लाखांचा निधी देण्यात आला आहे.



महानगरपालिका क्षेत्रातील शाळांकरितादेखील प्रत्येकी ४ कोटी ५० लाख रुपये अॅस्ट्रॉनॉमी लॅब व सायन्स लॅबकरिता देण्यात आले आहे. युवकांच्या क्रीडा कौशल्याला चालना मिळावी यासाठी १६ कोटी रुपये व्यायामशाळा साहित्य, ओपन जिम, क्रीडा साहित्य तसेच कबड्डी, कुस्ती आणि खो-खो मॅट खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. श्री चतुश्रृंगी देवस्थान येथील विकासकामाकरिता दीड कोटी, जंगली महाराज देवस्थान येथील विकासकामांसाठी ६० लाख, ओंकारेश्वर व कसबा गणपतीसाठी प्रत्येकी ४० लाख आणि पाषाण तलावाच्या सुशोभिकरणाकरिता २० लाखांचा निधी देण्यात आला आहे.

पुणे शहरातील पोलीस वसाहतींच्या सुधारणाकरिता दोन कोटी रुपये, कोथरुड, दत्तवाडी पोलीस स्टेशन दुरुस्तीसाठी दीड कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलिसांकरिता वाहन खरेदीकरिता प्रत्येकी दोन कोटी रुपये देण्यात आले आहेत.

### उत्तम नियोजनाद्वारे 100 टक्के निधी वितरीत

» जिल्हा वार्षिक योजना २०२२-२३ अंतर्गत प्राप्त १०० टक्के निधी वितरीत करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी ८७५ कोटी रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनूसूचित जाती उपयोजना) साठी १२८ कोटी ९८ लाख आणि जिल्हा वार्षिक योजना (जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रम) साठी प्राप्त ५४ कोटी १० लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी सांगितले.

# आयोजक-गाडा मालकांमधील वाद अखेर मिटला!

## आमदार महेश लांडगे यांची यशस्वी मध्यस्थी : आयोजक अन् गाडामालकांमधील गैरसमज दूर

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अनेक वर्षे संघर्ष केल्यानंतर अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या माध्यमातून बैलगाडा शर्यत पुन्हा सुरू झाली. यामध्ये सर्वांचे योगदान आहे. बैलगाडा शर्यतीला कोणाताही पक्ष नाही. बैलगाडा हाच आमचा पक्ष असतो. 'महाराष्ट्र केसरी बैलगाडा शर्यत' आयोजक आणि गाडामालकांमधील गैरसमज दूर झाला आहे, अशी ठाम भूमिका आमदार महेश लांडगे यांनी मांडली.**



खेड तालुक्याचे माजी सभापती रामदास ठाकूर-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त चऱ्होली खुर्द येथे 'महाराष्ट्र केसरी बैलगाडा स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत महिंद्रा थार, ट्रॅक्टर, बुलेट आणि दुचाकी अशी मोठी बक्षीसेही ठेवण्यात आली होती. सलग पाच दिवस सुरू असलेल्या या स्पर्धेला शेवटच्या दिवशी गालबोट लागले.

शिवराज आव्हाळे, आव्हाळवाडी, बाळासाहेब साकोरे, फुलगाव, विनायक मोरे, चिखली, रामनाथ वारिंगे, वारंगवाडी, बापुसाहेब आल्हाट, निघोजे आणि शिवराज आव्हाळे, आव्हाळवाडी या पाच गाडा मालकांना महिंद्रा थार गाडीचे बक्षीस विभागून देण्यात आले. फायनलच्या बारीदरम्यान रामनाथ वारिंग यांच्या गाडीने ११.५२ सेकंदात घाट पार केला, असा निर्णय पंचांनी दिला. मात्र, हा निर्णय वारिंगे यांना मान्य नव्हता. तसेच, आयोजक आणि पंच आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्यामुळे वाद निर्माण झाला. यामध्ये मावळचे आमदार सुनील शेळके यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. पंच आणि आयोजकांचा निर्णय मान्य असल्याचे सांगितले. पोलिसांच्या मदतीने वादाचा प्रसंग नियंत्रणा आणला. मात्र, बैलगाडा आयोजक आणि मालकांमधील वाद धुमसत होता.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत आयोजक आणि गाडामालक यांची समोरासमोर बैठक घेण्यात आली. बैलगाडा शर्यत हा आपला परिवार आहे. त्यामुळे परिवारातील वाद सामंजस्याने मिटवण्याची भूमिका घेण्यात आली. यावेळी आयोजक रामदास ठाकूर-पाटील, गाडामालक रामनाथ वारिंगे, शिवराज आव्हाळे यांच्यासह अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नाही...

**» आमदार लांडगे म्हणाले की, खेडचे माजी सभापती रामदासशेठ ठाकूर-पाटील यांनी घेतलेल्या 'महाराष्ट्र केसरी बैलगाडा' स्पर्धांचा हेतू हाच आहे की, शेतकऱ्यांचा आनंद टिकला पाहिजे. आपली परंपरा टिकली पाहिजे. शेतकऱ्यांचा हा खेळ उंचीवर नेण्यासाठी कोणी प्रयत्न करीत असेल, तर आम्ही सर्व बैलगाडा मालक, संघटना, बैलगाडा प्रेमी निश्चितपणे मदत करणार आहेत. स्पर्धेत अत्यंत सक्षमपणे नियोजन करण्यात आले. एवढ्या भव्य प्रमाणात शर्यती होत आहेत. त्यामुळे किरकोळ वाद होणे स्वाभाविक आहे. त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. या ठिकाणी कोणाताही पक्ष नाही. बैलगाडा हाच स्पर्धेत पक्ष असतो. त्यामुळे राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नाही.**

### आवश्यक सुविधा पुरविण्याची तयारी...

**» आयुक्त शेखर सिंह म्हणाले, विचार प्रबोधन पर्वामध्ये महापालिका दरवर्षी विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करत असते. यावर्षी देखील असे कार्यक्रम होणार आहेत. सर्व कार्यक्रम आनंदाच्या वातावरणात आणि व्यवस्थित पार पाडण्यासाठी महापालिका चांगले नियोजन करणार आहे. शहरात मोठ्या उत्साहात जयंती साजरी होत असते. त्यादृष्टीने महापालिकेने सर्व आवश्यक सुविधा नागरिकांना उपलब्ध करून द्याव्यात. मिरवणूक मार्गावर महापालिकेचे चालू असलेले काम वेळेत पूर्ण करावेत. विशेषतः पिंपरी येथील उड्डाण पुलाचे काम आणि वाकड येथील रस्त्यांचे काम यावर लक्ष केंद्रित करावे. पिंपरी आणि दापोडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात दरवर्षी नागरिकांसाठी पालिकेकडून आवश्यक सुविधा पुरवल्या जातात. येथे सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस आणि महापालिका प्रशासनाने समन्वयाने नियोजन करावे. रोजगार मेळावा, रक्तदान शिबीर यासह अनेक कार्यक्रमांचे आयोजन तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमरे, शौचालयाची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, मंडप व्यवस्था आदी बाबींची पूर्तता संबंधित विभागाने वेळेत पूर्ण कराव्यात, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिल्या.**

---

# 'आरटीई' प्रवेशाची आज लॉटरी पद्धतीने सोडत!

## »सुमारे तीन लाख 64 हजार 470 अर्ज प्राप्तः प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांची माहिती

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षण अधिकार कायद्यानुसार राज्यातील खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा मागास, आर्थिक दुर्बल आणि अल्पसंख्याक घटकांसाठी राखीव ठेवल्या जातात. यंदा राज्यभरातील ८ हजार ८२८ शाळामध्ये १ लाख १९६९ जागा रिक्त आहेत. त्यासाठी सुमारे तीन लाख ६४ हजार ४७० अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यातील विद्यार्थ्यांना 'आरटीई'तून मोफत प्रवेश मिळणार आहे. ५ एप्रिल बुधवारी या प्रवेशाची लॉटरी निघणार आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.**




ऑनलाईन सोडत (लॉटरी) बुधवारी दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) येथे काढण्यात येणार आहे, असेही शरद गोसावी यांनी काढलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे. इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेण्याचे स्वप्न आर्थिक परिस्थितीमुळे पूर्ण होत नाही. त्या समाज घटकातील मुलांची स्वप्नपूर्ती 'आरटीई'च्या माध्यमातून केली जाते. दरवर्षी राज्यातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील एकूण प्रवेश क्षमतेतील २५ टक्के जागा राखून ठेवल्या जातात. कायद्यानुसार संबंधित शाळांसाठी ते सक्तीचे आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यातील आठ हजार ८२८ इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळांमध्ये 'आरटीई'अंतर्गत प्रवेश मिळणार आहे.ऑनलाइन पद्धतीने लॉटरी काढली जाणार आहे. प्रवेश प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन असल्याने त्यात कोणताही मानवी हस्तक्षेप चालत नाही. लॉटरी निघाल्यानंतर प्रवेशासाठी ठराविक मुदत दिली जाते. त्यानंतरही काही जागा रिक्त राहिल्यास प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार आहे.

### पालकांच्या मोबाईलवर मेसेज येणार

**»प्रवेश निश्चित करण्यासाठी संबंधित शाळेत जाताना पालकांनी त्यांच्याकडे जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, मुलाचे आधारकार्ड, अशी प्रवेश अर्जावेळी भरलेल्या माहितीनुसार सर्व कागदपत्रे घेऊन जावी लागतील. तसेच खुल्या प्रवर्गातील एसईबीसी प्रवर्गातील मुलांसाठी एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असल्याचा पालकांचा उत्पन्न दाखला लागतो. दरम्यान, प्रवेश निश्चित झालेल्या म्हणजेच लॉटरीत नंबर लागलेल्या मुलांच्या पालकांच्या मोबाईलवर मेसेज येणार आहेत.**

## संपादकीय »

# करलो दुनिया वज्रमुठी में...!

***'मा. दादासाहेब यांसी जय महाराष्ट्र. छत्रपती संभाजीनगरातून काल रात्रीच बांद्र्याला परतलो. दमणूक झाल्यामुळे 'पोचलो' असा मेसेज लगेच केला नाही. घरी परतेपर्यंत उशीरच झाला होता. पत्र लिहिण्यास कारण की थँक्यू! आपल्या वज्रमूठ सभेत सर्वात उंच पाठीची खुर्ची माझ्यासाठी राखून ठेवलेली पाहून मला खरे तर भरुन आले होते. मी (सवयीप्रमाणे) सर्वात शेवटी सभेच्या ठिकाणी पोचलो.***

भाषणाला उभा राहिलो, तर फटाक्यांची आतिषबाजी झाली. दचकलोच होतो! कारण आता आपल्याला एखादे पंजाबी गाणे म्हणावे लागणार की काय, अशी क्षणभर भीती वाटली. आज माझ्याकडे ना पक्षाचे नाव, ना पक्षाचे चिन्ह! तरीही केवढं हे आतिथ्य! पुन्हा थँक्यू!! तथापि, आपल्या वज्रमूठ सभेला मा. नानासाहेब पटोलेजी दिसले नाहीत.

त्यांची खुर्ची मी शोधत होतो. पण ते आलेच नाहीत, असे नंतर कळले! आपल्या आघाडीची प्रचंड मोठी सभा घेण्याचे गेले काही महिने ठरत होते. या सभेचे प्लानिंगही चांगले झाले होते. गर्दी बघून तर त्या कमळवाल्यांच्या आणि मिंधेगटाची बोबडी वळली असेल!! पण सगळे असूनही आपले नानासाहेब पटोलेजी नव्हते. तथापि, तुम्हाला स्टेजवर बघून माझा जीव खरा भांड्यात पडला!!

त्यांची तब्बेत थोडी बरी नसल्याचे मला आमच्या संजयाजी राऊत यांनी सांगितले. ते म्हणाले की 'आत्ता फोन केलात तरी घोगरा आवाज येतोय! त्यांना करु दे आराम!' तरीही मी त्यांना खूप मिस केले. मा. अशोकराव आणि मा. बाळासाहेब होते, त्यांनाही मी 'नानासाहेब कुठायत' असे विचारुन घेतले.

त्यांनी एकमेकांकडे पाहून खांदे उडवले आणि ते निघूनच गेले. चालायचेच. मा. नानासाहेबांनी सभेला दांडी मारली, पण राहुलजींच्या केससाठी लागलीच ते सुरतला रवाना झाल्याचे सांगण्यात आले. हल्ली कोणीही सुरतला गेले की पोटात गोळा येतो!! जाऊ दे.

बाकी आपली वज्रमूठ सभा दृष्ट लागण्याइतकी चांगली झाली. एवढ्या खुर्च्या एकगठ्ठा बघण्याची वेळ फार कमी वेळा येते. तुमचे भाषणही चांगले झाले असे कळले. (मी ऐकले नाही, तेव्हा मी मोटारीत होतो...) एकंदरीत आपल्या महाविकास आघाडीची वज्रमूठ अभेद्य राहणार, अशी आता तरी चिन्हे दिसत आहेत.

(कांग्रेसचे मा. अशोकराव भाषणात मला 'भला माणूस' म्हणाले! ऐकून घशात आवंढा आला होता!!) तरीही मा. नानासाहेब असते तर बरे झाले असते, असे वाटते. पोस्टरवरचा माणूस प्रत्यक्षात गायब राहिल्याने वज्रमुठीत फट राहिली, असे लोक म्हणू लागले आहेत. काय उत्तर द्यायचे?

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे दैवत, त्यांची थट्टा!




नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील सभेत बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसनेते राहुल गांधी याना इशारा देताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा आधार घेतला. मुळात उद्धव ठाकरे यांच्या सेनेने ज्या महाविकास आघाडीत राजकीय आश्रय घेतला त्या आघाडीचे सावरकर यांच्या विषयी काय मत आहे याबाबत ठाकरे काही अनभिज्ञ नव्हते. काँग्रेसने दोन वर्षांपूर्वीच सावरकरांवर उघड हल्ले करायला सुरुवात केली होती. असे असताना राजकीय तडजोड म्हणून ठाकरेंनी आघाडीला जवळ केले कारण राजकीय अपरिहार्यता होती. आता पुढे निवडणुकांना सामोरे जायचे असल्याने लोक सावरकरांवर ठाकरे सेनेला नक्कीच प्रश्न विचारून भंडावून सोडतील त्यासाठी काहीतरी पवित्रा घ्यायला हवा या मजबुरीतून उद्धव ठाकरे यांनी सावरकर आमचे दैवत असल्याचा राग आलापला आहे. नवल असे आहे की आघाडीत एकाचे दैवत दुसऱ्यासाठी थट्टेचा विषय बनलेला आहे.

राज्यात भाजपला तगडी फाईट देण्यासाठी महाविकास आघाडी सध्यातरी मजबूत पर्याय म्हणून उदयास आलेली आहे. परिषदेच्या निवडणुकांचा निकाल आणि कसब्याचा कौल पाहिल्यावर आघाडीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. भाजपला राज्यात एकास एक उमेदवार दिल्यास महाविकास आघाडी निकराची झुंज देऊन मात देऊ शकते असे वातावरण निर्माण झाले असताना उद्धव ठाकरे काँग्रेसला असे इशारे द्यायला लागले तर ही आघाडी आगामी पालिका निवडणुकीत तरी असेल का असा प्रश्न निर्माण व्हायला लागला आहे. काँग्रेसोबत म्हणजे सेक्युलर पक्षांच्या सोबत जाऊनही आपण कसे हिंदुत्व सोडले नाही आणि भाजपच्या तुलनेत आपले हिंदुत्व कसे अजूनही कडवे आणि शाबूत आहे याची कसरत उद्धव ठाकरे याना अलीकडे सतत करावी लागते. त्यामुळे सावरकर आणि हिंदुत्व हा विषय ठाकरेंना अडचणीच्या जागेवरचे दुखणे झाले आहे.



गेल्या काही वर्षात सावरकर यांच्या बाबत देश पातळीवर आणि महाराष्ट्रातही जी अस्सल कागदपत्रे,पुरावे पुढे आले आहेत ,खास करून पत्रकार निरंजन टकले यांनी अत्यंत परिश्रम करून १४ हजारावर कागदपत्रे गोळा केली आहेत त्यावरून आजवर हिंदुत्व गटाकडून मांडले गेलेले सावरकर उघडे पडतात. या नव्या संशोधनाचा आधार घेऊनच राहुल गांधी याची पुराव्यासह सावरकर मांडायला सुरुवात केली आहे. भाजपला त्याचा राग तर अनावर झाला आहेच त्यासोबतच मोदी आणि अदानी यांच्यातल्या नात्यांवर राहुल गांधी उघडपणे भाष्य करायला लागणे हे जिव्हारी लागले आहे. त्यांच्यावर अतिशय शुल्लक मुद्दा उकरून काढीत कारवाई करणे हा त्याचा दुखण्याचा एक भाग असल्याचे आता लपून राहिले नाही. उद्धव ठाकरे याना सावरकर यांच्या बाबतचे नवे संशोधन माहित नाही अश्यातला भाग नाही ,कदाचित त्यांना सगळे कळते परंतु मतांचा विचार करता ते वळत नाही असा त्यांच्या ताज्या वक्तव्याचा अर्थ आहे.

उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचा भाग झाल्यावर आणि मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावर त्यांची बाजू घेऊन किल्ला लढविणाऱ्या सेक्युलर समूहात अचानक भरती आली होती मात्र परवाच्या सावरकर बाबतच्या इशाऱ्याने या सेक्युलर समूहाला धक्का बसला आहे हे चाललेल्या चर्चेवरून दिसते. उद्धव ठाकरे कितीही प्रबोधनकार ठाकऱ्यांचे नाव घेऊन उच्च रवात कंठशोष करीत असले तरी प्रबोधन त्यांच्या वागण्यात आणि विचारात दिसत नसल्याचे अलीकडे लोकांच्या लक्षात आले आहे. गेल्या सात,आठ महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या विषयी सेक्युलर लोकांनी निर्माण केलेल्या सहानुभूतीचा फुगा स्वतः ठाकरे यांनीच फोडला असल्याचे दिसते.

# मुलांच्या मनातील भय कमी कसं करावं?

**चिंताग्रस्तता ही भारतीय तरुणांसमोरची एक गहन समस्या बनली असल्याचं माझं निरीक्षण आहे. अशी तीव्र चिंता त्यांच्या मनातील असुरक्षिततेच्या भयामुळेच निर्माण होते. हरण्याचं भय, गमावण्याचं भय, अपयशी ठरण्याचं भय, अनिश्चित भवितव्याचं भय... याच साऱ्या भयांपोटी मुलं असुरक्षित बनतात.**

या भयगंडामुळे ती खोटंही बोलू लागतात. भावी जीवनातील त्यांच्या अनैतिक आणि धोकादायक वर्तनाला हाच भयगंड कारणीभूत ठरतो.

मुलं भयगंडग्रस्त का होतात?

काही मुलांना अगदी लहान असल्यापासूनच खरंखुरं सांगितल्याबद्दल ओरडा खावा लागलेला असतो, बरेचदा मारही बसलेला असतो. मुलांमध्ये भयगंड निर्माण होण्याचं हे एक कारण असू शकतं. शिक्षेच्या भीतीमुळे खऱ्या गोष्टी मुलं लपवू लागतात, शिक्षा टाळण्यासाठी खोटं बोलू लागतात. खोटं बोलणं फायद्याचं ठरतं ही गोष्ट एकदा त्यांच्या लक्षात आली, की मग ती त्यांची सवयच बनते. मग त्यातूनच भयगंड तयार होतो. कारण खरं काय ते बाहेर येईल, याची भीती त्यांना सदैव छळत राहते.

कुटुंब, सवंगडी आणि इतरही अनेक जण अभ्यासात चमकण्याचं प्रचंड दडपण मुलावर आणत असतात, त्यामुळेही हीच परिस्थिती उद्भवते. परीक्षांच्या सततच्या दडपणामुळे हा भयगंड वाढतच जातो. एक परीक्षा पार करून दुसरीसाठी राबत राहणं हेच मुलांचं जीवन बनतं. नापास झालास तर अख्ख्या आयुष्याचाच बट्ट्याबोळ होईल, अशी भुणभुण शिक्षक आणि पालक मुलांच्या मागे सतत लावतच असतात. यामुळे तर मुलांचा भयगंड अधिकच घट्ट होतो.



परीक्षा पार करण्याचं हे भय अव्याहत मागे लागल्यामुळे मुलांचं कुतूहल कमी कमी होत आहे. हे भय त्यांच्या सर्जनशीलतेलाही मारक ठरत आहे. या परीक्षा-संस्कृतीने पिढीच्या पिढी नुसती कारकुनांची बनवलीय. अशा कारकुनी पिढीला व्यवस्थापन जमतं; पण निर्मिती, उपक्रमशीलता यांत त्यांना फारशी गती नसते. समाज माध्यमं या भयगंडात आणखीनच भर घालत असतात. या माध्यमांवर आल्हाददायक प्रतिसाद सातत्याने न मिळत राहिल्याने मन चिंतातुर होतं. नाकारलं जाण्याचं भय तर सततच भेडसावत असतं. या भयातून चिंता आणि(अवधान अभाव विकार) निर्माण होतो. आपल्या कृतीला सतत शाबासकी मिळावी अशीच तरुण मुलांची इच्छा असते. समाजमाध्यमात असं प्रोत्साहन लाइक्स, स्तुतीपर कमेंट्स या स्वरूपांत मिळत असतं आणि ते न मिळण्याचं भय संपता संपत नसतं. यातून एकाकीपण, क्रोध निर्माण होतो. मुलाचं वर्तन बेदरकार होऊ लागतं. हा बेदरकारपणा मन मानेल तशी गाडी दामटण्यातून किंवा संवादातील बेफिकीरपणातूनही व्यक्त होत राहतो. काही टोकाच्या उदाहरणांत तर याचं पर्यवसान आत्महत्येतसुद्धा होऊ शकतं.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# फडणवीस फडतूस, गृहमंत्री नव्हे हे तर गुंडमंत्री

## ठाण्यातील प्रकरणावरून उद्धव ठाकरेंचा घणाघात

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एक फडतूस गृहमंत्री राज्याला मिळाला आहे. उपमुख्यमंत्रीपद मिळाले म्हणून लाचारी, लाळघोटेपणा करणारी व्यक्ती 'फडणवीसी' करत आहे, अशा कठोर शब्दांत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. सोमवारी रात्री, शिवसेना शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांनी ठाकरे गटाच्या रोशनी शिंदे यांना बेदम मारहाण केली. रोशनी शिंदे यांची आज रुग्णालयात ठाकरे कुटुंबीयांनी भेट घेतली.**



रोशनी शिंदे यांची भेट घेतल्यानंतर उद्धव ठाकरे, खासदार राजन विचारे, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, आयुक्त कार्यालयात नसल्याने रोशनी शिंदे प्रकरणी चर्चा होऊ शकली नाही. त्यानंतर, उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आपला संताप व्यक्त केला. उद्धव यांनी म्हटले की, सर्वोच्च न्यायलयाने सरकार नपुंसक असल्याचे म्हटले होते. त्याची प्रचिती ठाण्यात आली. एका महिलेला मारहाण करण्यात आली. त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. इतकंच काय या पीडित महिलेची तक्रार दाखल करून घेतली नसल्याचे उद्धव यांनी म्हटले.

### फडणवीसांवर निशाणा

**»राज्यातील सत्तांतरानंतर आज उद्धव ठाकरे कमालीचे आक्रमक दिसले. ठाण्यातील घटनेवरून त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. राज्याला फडतूस गृहमंत्री मिळाला असल्याचे त्यांनी म्हटले. स्वत: च्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना मिंदे गटाच्या लोकांनी बेदम मारहाण केली. तरी, त्यावर कारवाई होत नाही. स्वत: च्या कुटुंबीयांची काही गोष्ट असली की आरोपीला परराज्यातूनही अटक होते, असेही ठाकरे यांनी म्हटले. फडणवीस यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा दिला पाहिजे अशी मागणीदेखील उद्धव यांनी केली.**

तुमची गुंडगिरी मोडून काढू

सोमवारी रात्री ठाकरे गटाच्या महिला कार्यकर्त्या रोशनी शिंदे यांच्यावर शिंदे गटाच्या महिलांनी हल्ला केला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेवरून उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला आव्हान दिले. तुमची ठाण्यातील नव्हे तर राज्यातील गुंडगिरी मुळासह उखडून टाकण्याची ताकद शिवसैनिकांमध्ये आहे, असा सज्जड इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

**ठाकरे कुटुंबियांनी रोशनी शिंदेंची रुग्णालयात घेतली भेट**

रोशनी शिंदे यांच्यावर खासगी रुग्णालयातील आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. तिथं जाऊन ठाकरे कुटुंबियांनी त्यांची विचारपूस केली. ठाकरे कुटुंबियांनी रोशनी शिंदे यांची विचारपूस करुन त्यांना दिलासा आणि आधार देण्याचा प्रयत्न केला. या घटनेवरुन आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. रोशनी शिंदे यांना आयसीयूमध्ये दाखल करणं हा दिखावा आहे, त्या गर्भवती नाहीत, असा दावा शिंदे गटाकडून करण्यात आला होता. परंतु त्यानंतर ठाकरे कुटुंबियांनी ठाण्यात येणं, रुग्णालयात जाऊन त्यांनी भेट घेणं हा राजकारणचा भाग आहे, असंही शिवसेनेने म्हटलं. मात्र उद्धव ठाकरे यांनी रुग्णालयात येऊन विचारपूस करणं यावरुन असा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला की, ठाकरे गटाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या ते मागे खंबीरपणे उभे आहेत, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

### फडणवीसांचा उद्धव यांना इशारा



**» उद्धव ठाकरे काय होतास तू, काय झालास तू, असा कसा वाया गेलास तू... अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. नागपुरात स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेच्या समारोप सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी लक्षात ठेवा फडतूस नाही तर काडतूस आहे.. झुकेगा नही साला... मैं घुसेगा...अशी शेरेबाजीदेखील केली. ठाण्यात ठाकरे गटाच्या महिला कार्यकर्ता रोशन शिंदे यांना शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्री मारहाण केली. त्यानंतर आज उद्धव ठाकरे यांनी कुटुंबीयांसह तिची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी आपला संताप व्यक्त करत राज्याला फडतूस गृहमंत्री मिळाला असल्याची बोचरी टीका केली. ठाकरे यांच्या टीकेचे पडसाद आज उमटले. नागपुरात स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेच्या समारोप सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला.**

### घरकोंबडा बनून राहावे लागेल; बावनकुळेंचा इशारा




**» उद्धव ठाकरे यांना भाजपचा हा शेवटचा इशारा असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले. उद्धव ठाकरेंनी आपली मर्यादा ओलांडली तर भविष्यात आम्हाला आमची मर्यादा ओलांडावी लागेल. देवेंद्र फडणवीसची बरोबरी करण्याची उद्धव ठाकरेंची पात्रता नसल्याचे बोचरी टीका केली. बाळासाहेबांचे टाचणीभर ही गुण हे उद्धव ठाकरे यांच्याकडे नाही. मुलगा म्हणून सोडले तर तर उद्धव ठाकरे यांच्याकडे ना बाळासाहेबांचे विचार आहे, ना त्यांच हिंदुत्व आहे, ना तसं कर्तृत्व आहे असेही बावनकुळे यांनी म्हटले.**

---

## सुमारे दीड लाख गिरणी कामगार अद्यापही घराच्या प्रतीक्षेत

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



१९८२ च्या संपानंतर पुन्हा सुरु होऊ न शकलेल्या गिरण्यांच्या जागा मालकांना विकसित करण्यास परवानगी देताना गिरणी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरी आतापर्यंत फक्त १५ हजार गिरणी कामगारांना घरे मिळू शकली आहेत. अद्यापही या सर्व गिरण्यांमधील सुमारे दीड लाख गिरणी कामगार वा त्यांचे वारस घराच्या प्रतीक्षेत आहेत. भविष्यात घर मिळू शकणार आहे किंवा नाही, याचीही त्यांना शाश्वती राहिलेली नाही. मुंबईत फारच कमी घरे निर्माण होण्याची शक्यता असून गिरणी कामगारांना यापुढे मुंबईबाहेर तरी घरे मिळेल का हा एक प्रश्नच आहे.


बंद पडलेल्या वा आजारी कापड गिरण्याच्या विक्री व विकासासंदर्भात नव्या विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्येही तरतूद करण्यात आली आहे. मुंबईतील ५८ गिरण्यांची मोकळी जागा आणि शिल्लक चटईक्षेत्रफळाचे वाटप महापालिका, म्हाडा आणि गिरणी मालक यांच्यात समसमान करण्यात आले आहे. म्हाडाला उपलब्ध होणाऱ्या एकूण भूखंडापैकी दोन तृतीयांश भूखंडावर गिरणी कामगारांसाठी घरे आणि एक तृतीयाश घरे संक्रमण शिबिर अशी नियमावलीत तरतूद करण्यात आली आहे. ५८ गिरण्यांपैकी ३२ खासगी, २५ राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या तर एक गिरणी राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीच्या आहेत.

## राज्यात कोरोनाचे वेगाने पुनरागमन

### 24 तासांत रुग्णसंखेत 186 टक्क्यांनी वाढ, 4 मृत्यू

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत कोरोनाचा सर्वाधिक फटका बसलेल्या महाराष्ट्रात पुन्हा एकदा कोरोना रुग्णांची संख्या वाढताना दिसून येते आहे. आज (४ एप्रिल) राज्यात ४ कोरोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तसेच आज राज्यात ७११ नवीन रुग्णांची भर पडली आहे. राज्यात मागील २४ तासांत झालेली ही वाढ १८६ टक्के इतकी आहे.



**»मंगळवारी संपूर्ण राज्यभरात ४ जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या राज्यातील मृत्युदर हा एक १.८२% इतका आहे. आज मृत पावलेल्या रुग्णांची संख्या पिंपरी चिंचवड मनपा - १, सातारा - २ आणि रत्नागिरी - १ अशी आहे.**

मंगळवारी संपूर्ण राज्यभरात ४ जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या राज्यातील मृत्युदर हा एक १.८२% इतका आहे. आज मृत पावलेल्या रुग्णांची संख्या पिंपरी चिंचवड मनपा - १, सातारा - २ आणि रत्नागिरी - १ अशी आहे.

एक दिवस आधी राज्यात २४८ रुग्णांची नोंद झाली होती. राज्यात मागील सात दिवसात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात सध्याचा मृत्यूदर हा १.८२ टक्के इतका आहे. आज दिवसभरात तब्बल ४४७ रुग्ण बरे होऊन घरी परतले. तसेच आजपर्यंत राज्यात एकूण ७९,९४,०६० करोना बाधित रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचेप्रमाण ९८.१३ टक्के इतका आहे.राज्यात कोरोना रुग्णांचे प्रमाण वाढत असताना कोणताही मोठा धोका नसल्याचं आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी सांगितलं आहे. आरोग्य यंत्रणा सज्ज असून मी दर २४ तासात याबाबत आढावा घेत असून आरोग्य विभागाला योग्य त्या सूचना देत असल्याचं आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी म्हटलं आहे.

# मोदींनी चिनला क्लिनचिट दिल्यामुळेच चिनच्या कुरापती वाढल्या!

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

**अंतर्गत समस्याने त्रस्त असलेल्या चीनने भारताविरुद्ध उचापती करण्यास सुरूवात केली आहे. आता पुन्हा एकदा अरुणाचल प्रदेशच्या काही ठिकाणांची नावे चिनी, तिबेटी आणि पिनयिन लिपीत प्रसिद्ध करतानाच या भूभागावरही दावा केला आहे. यावरून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे.**

मार्च महिन्यात चीन आणि अरुणाचल प्रदेशला विभाजित करणारी मॅकमोहन रेषा ही अमेरिकेने आंतरराष्ट्रीय सीमा मानली आहे. या मुद्द्यावर अमेरिकन संसदेत द्विपक्षीय ठराव मांडण्यात आला होता. या ठरावानुसार अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग मानला गेला आहे. खासदार बिल हेगर्टी आणि जेफ मार्केल यांनी हा ठराव मांडला होता.

## मल्लिकार्जुन खर्गे यांची टीका

मात्र तरीही चीनने पुन्हा आगळीक करत अरुणाचल प्रदेशवर आपला दावा सांगितलाच. चीनच्या नागरी व्यवहार मंत्रालयाने रविवारी चिनी, तिबेटी आणि पिनयिन लिपीत, अरुणाचल प्रदेशातील 11 ठिकाणांची नावे जाहीर केली. यामध्ये दोन भूभागांची नावे, दोन निवासी क्षेत्रांची नावे, पाच पर्वतीय प्रदेशांची नावे आणि दोन नद्यांची नावे समाविष्ट आहेत. चीन सरकारच्या प्रांतीय परिषदेने या परिसराला जंगनन असे नाव ठेवून तो तिबेटच्या दक्षिणेकडील भाग असल्याचे म्हटले आहे.

चीन सरकारने अरुणाचल प्रदेशातील भूभागांना नवीन नावे जारी करण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी 2017मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशातील सहा ठिकाणांच्या नावे आणि 2021मध्ये 15 ठिकाणांची नावे जाहीर केली होती. भारताने तीव्र आक्षेप घेत नावांच्या या दोन्ही याद्या फेटाळून लावल्या आहेत.



### नाव बदलास भारताचा आक्षेप

**» चीन सरकारने अरुणाचल प्रदेशातील भूभागांना नवीन नावे जारी करण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी 2017मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशातील सहा ठिकाणांच्या नावे आणि 2021मध्ये 15 ठिकाणांची नावे जाहीर केली होती. भारताने तीव्र आक्षेप घेत नावांच्या या दोन्ही याद्या फेटाळून लावल्या आहेत.**



यावरून काँग्रेसने केंद्र सरकारवर टीका केली आहे. आपल्या अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याची आगळीक चीनने तिसऱ्यांदा केली आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तो पुढेही राहील. मात्र, लडाखमधील गलवान येथे झालेल्या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनला क्लीनचिट दिल्याचे परिणाम देशाला भोगावे लागत आहे, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली आहे.

# चीनच्या कुरापती वाढल्या

## अरुणाचल प्रदेशातील 11 ठिकाणांची नावं बदलली

।बीजिंग महाईन्यूज ।

चीन भारताविरोधातील डावपेच सोडत नाहीये. चीननं आता आपल्या नकाशात अरुणाचल प्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या 11 ठिकाणांची नावं बदलली आहेत.

चीननं गेल्या पाच वर्षांत तिसऱ्यांदा असं केलंय. यापूर्वी 2021 मध्ये चीननं 15 आणि 2017 मध्ये 6 ठिकाणांची नावं बदलली होती. चीननं अरुणाचल प्रदेशला भारताचं राज्य म्हणून कधीही मान्यता दिलेली नाही. त्यांनी अरुणाचलचं वर्णन 'दक्षिण तिबेट'चा भाग म्हणून केलंय.

भारतानं तिबेटचा भूभाग जोडून अरुणाचल प्रदेश बनवल्याचा चीनचा आरोप आहे. चीननं एक नकाशाही जारी केलाय. यामध्ये अरुणाचल प्रदेशचा काही भाग दक्षिणेकडील तिबेट प्रदेशात दाखवण्यात आला आहे. त्यात अरुणाचल प्रदेशची राजधानी इटानगर जवळील शहराचाही समावेश आहे.चीनचं अधिकृत वृत्तपत्र 'ग्लोबल टाईम्स'नुसार, सोमवारी चीनच्या नागरी व्यवहार मंत्रालयानं 11 नावांच्या बदलाला मंजुरी दिलीये. हे सर्व क्षेत्र झेंगनान (चीनच्या दक्षिणेकडील शिनजियांग प्रांताचा भाग) अंतर्गत येतात. त्यापैकी 4 निवासी क्षेत्रं आहेत. यापैकी एक भाग अरुणाचल प्रदेशची राजधानी इटानगरपासून अगदी जवळ आहे. 5 डोंगराळ भाग आणि दोन नद्या आहेत. चीननं या भागांना मंदारिन आणि तिबेटी भाषांमध्ये नावं दिली आहेत.



# कर्नाटकमधील निवडणुकीच्या तोंडावर CM शिंदेंचे सीमाभागातील नागरिकांना मोठं गिफ्ट!

## » 865 गावातील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषिक गावातील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या बेळगाव कारवार कलबुर्गी व बिदर जिल्ह्यातील बारा तहसील मधील 865 गावांना योजनेचा फायदा होणार आहे.**

या योजनेअंतर्गत नागरिकांना प्रतिक कुटुंब प्रति वर्ष 1.5 लक्ष रकमेचे विमा संरक्षण रक्कम व 996 उपचारांचा लाभ मिळणार आहे. बेळगाव येथील केएलई हॉस्पिटल व पणजी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या रुग्णालयांमध्ये योजनेचा लाभ मिळणार आहे.




कर्नाटकमध्ये विधानसभा निवडणुका (१० मे) महिन्याभरात होणार आहेत. भाजपा आपली सत्ता टिकवण्यासाठी तर काँग्रेस आणि जेडीएस पुन्हा एकदा सत्ता मिळवण्यासाठी संघर्ष करताना दिसत आहे. महाराष्ट्र सीमेलगत असलेला बेळगाव जिल्हा हा कर्नाटकच्या राजकारणात नेहमीच केंद्रस्थानी राहिला आहे.त्यामुळे शासनाने या योजनेच्या अंतर्गत, योजनेच्या लाभार्थ्यांबरोबर सर्वच नागरिकांना या करोना महामारीच्या संकटामध्ये नागरिकांवर आर्थिक बोजा पडू नये आणि जनतेला आरोग्य विषयक हमी देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा कालावधी शासनाने वाढविण्याचा निर्णय घेतला आहे

### ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना काय आहे?

**» महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना हि अशीच एक आरोग्य योजना आहे, या योजनेंतर्गत राज्यातील गरीब व आर्थिक दुर्बल, वंचित नागरिकांना शासनाने निर्धारित केकेल्या सूचीबद्ध शासकीय / निमशासकीय किंवा धर्मादाय रुगांलयात गंभीर आजारांमध्ये, नागरीकांना या योजनेंतर्गत विमा संरक्षण देऊन मोफत वैद्यकीय सुविधांचा लाभ दिला जातो, याच बरोबर यावेळी संपूर्ण जगामध्ये कोविड -19 करोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेला आहे तसाच राज्यामध्ये सुद्धा करोना विषाणूचा प्रसार मोठया प्रमाणात झाला होता,**

# सिक्कीम येथे हिमस्खलन; सहा पर्यटकांचा मृत्यू, ११ जखमी!

। गुवाहाटीः ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सिक्कीम येथे झालेल्या हिमस्खलनात सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. तर ११ जण जखमी झाले आहेत. ८० पर्यटक बर्फात अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. शोध मोहिम सुरु करण्यात आली आहे. ही घटना घडली तो नाथुला परिसर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे.

गंगकोट येथली नाथुला परिसरात हे भूस्खलन झाले आहे. जवाहारलाल नेहरु रोडवरील १५ व्या मीलवर हे हिमस्खलन झाले आहे. येथे १५० पर्यटक होते, असा अंदाज आहे. त्यातील सहा जणांचा मृत्यू झाला. ३० पर्यटकांना वाचवण्यात यश आले आहे. त्यात ११ जखमी आहे. अन्य ८० पर्यटक हिमस्खलनात अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक पोलिसांनी शोध मोहिम सुरु केली आहे.



ही घटना मंगळवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. अचानक हिमस्खलन झाल्याने पर्यटकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव सुरु केली. मात्र वेगाने झालेल्या भूस्खलनात पर्यटक अडकले. येथे तत्काळ बचावकार्य सुरु झाले. बर्फात अडकलेल्या सहा जणांना गंगटोकच्या एसटीएनएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये चार पुरुष, एक महिला आणि एका लहान मुलाचा समावेश आहे. घटनास्थळी सिक्किम पोलीस, सिक्किम TRAVEL असोसिएशन, पर्यटन विभागाचे अधिकारी व वाहन चालक बचावकार्य करत आहेत.

# खाकी वर्दी अन् पिस्तुलसह राणी मुखर्जी परतणार

बॉलिवूड इंडस्ट्रीची आवडती अभिनेत्री राणी मुखर्जीचा नुकताच प्रदर्शित झालेला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला आहे. या चित्रपटात राणीने एका आईची भूमिका साकारली आहे जी आपल्या मुलाचा ताबा मिळवण्यासाठी सर्व संकटांशी लढते. त्याचवेळी राणीने तिच्या लेटेस्ट मुलाखतीत या चित्रपटाबद्दल बोलले आहे. यासोबतच तिचा सुपरहिट चित्रपट 'मर्दानी' ची फ्रेंचाइजी 'मर्दानी 3' वर मोठे अपडेट देताना दिसली आहे.

राणी मुखर्जीने 'मर्दानी'मध्ये पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील तिच्या ऑफबीट पात्राला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि चित्रपट



फ्रँचायझीकडून खूप सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

त्याचवेळी, आता ताज्या मुलाखतीत राणी 'मर्दानी 3' वर बोलली आहे. खरं तर, अभिनेत्रीला विचारण्यात आले की तिला पुन्हा पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारायला आवडेल का? तर यावर राणी म्हणाली अर्थातच पण त्यासाठी एक 'आकर्षक कथा' असावी.'मर्दानी' फ्रँचायझीबद्दल राणी मुखर्जी म्हणाली, 'होय, मला पुन्हा शिवानी शिवाजी रॉयची भूमिका करायची आहे. पण हे सर्व स्टोरीलाइन आणि स्क्रिप्टवर अवलंबून आहे. मला वाटते की शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत पुनरागमन करणे मोहक ठरेल कारण मला ती भूमिका साकारताना खूप मजा येते. स्क्रिप्टच्या निवडीवर प्रतिक्रिया देताना राणी मुखर्जी म्हणाली, 'मला वाटते. मी जगभरातील थिएटर पाहते - काय येत आहे आणि लोक कोणत्या प्रकारचे काम करत आहेत. मला असे वाटते की लोकांना माहित असले पाहिजे असे चित्रपट आणि कथांशी नेहमी जोडले जावे. हा माझा आदर्श आहे आणि ते पुन्हा पुन्हा येत नाही. वेळ लागतो. त्यामुळे माझ्या पुढच्या चित्रपटाचा निर्णय घेण्यासाठी मी जितका वेळ घेते तितकाच वेळ कोणीतरी कथा घेऊन येण्यासाठी घेतो.'





# 'त्याला प्रेमाची कदर नाही म्हणून', नागा चैतन्य अन् शोभिताच्या नात्यावर सामंथा रुथ प्रभूची प्रतिक्रिया

साउथ इंडस्ट्रीतील पावर कपल म्हणून नागा चैतन्य आणि सामंथा रुथ प्रभू ओळखले जात होते. नागा चैतन्य आणि सामंथा रुथ प्रभू हे दक्षिण चित्रपटातील प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक होते.

त्याची जोडी चाहत्यांना खुप आवडत होती. मात्र त्याच्या नातं जास्त काळ टिकू शकलं नाही. लग्नाच्या चार वर्षांनंतर दोघेही एकमेकांपासून वेगळे झाले. त्याच्या घटस्फोटाने त्याच्या चाहत्यांना मोठा धक्काच बसला.मात्र आता गेल्या काही दिवसांपासून नागा चैतन्य पुन्हा एकदा त्याच्या प्रेमप्रकरणामुळे चर्चेत आहे. तो शोभिता धुलिपाला डेट करत असल्याच्या चर्चांना सध्या उधाण आले आहे.नुकताच सोशल मीडियावर एक फोटो व्हायरल झाला, या फोटोमध्ये नागा हॉटेलच्या शेफसोबत फोटो काढताना दिसत आहे आणि शोभिता साडी नेसलेली दिसत आहे. तिने तिचा चेहरा दिसू नये म्हणु चेहऱ्यावर हातही ठेवला होता. रिपोर्ट्समध्ये हे चित्र लंडनचं असल्याचं सांगण्यात येत आहे.

आता या प्रकरणावर नागा चैतन्याची माजी पत्नी आणि अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यामुळे नागा आणि शोभिता एकमेकांना डेट करत आहेत ही चर्चा खरी असल्याचं बोललं जात आहे.

# लोकांच्या टोमण्यामुळे श्वेता झाली दुःखी.

लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री श्वेता तिवारी तिच्या सौंदर्य आणि फोटोंमुळे नेहमीच चर्चेत असते. एकता कपूरच्या कसौटी जिंदगी की या मालिकेतील प्रेरणा या व्यक्तिरेखेने श्वेताला लोकप्रियता मिळाली.

श्वेता टीव्ही इंडस्ट्रीतील लोकप्रिय शो 'बिग बॉस'चा भाग देखील राहिली आहे आणि तिने शो जिंकला आहे. सध्या श्वेता 'अपराजिता' या मालिकेत अपराजिताच्या भूमिकेत दिसत आहे. आता सोशल मीडियावरील यूजर्सनी त्यांना पुन्हा लग्न न करण्याची सूचना केली आहे. श्वेता कपूर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. तिचे फोटो चाहत्यांमध्ये दररोज व्हायरल होत असतात. श्वेता 'नच बलिये', 'झलक दिखला जा' आणि 'खतरों के खिलाडी' या रिॲलिटी शोचाही भाग आहे. या शोमध्ये तिच्या खेळाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. श्वेता तिच्या व्यावसायिक आयुष्यात खूप यशस्वी आहे, पण तिच्या वैयक्तिक आयुष्यातही तितकीच दुखी आहे.विशेष म्हणजे श्वेताने 1998 मध्ये राजा चौधरीसोबत लग्न केले, पण 2007 मध्ये दोघांचा घटस्फोट झाला. यानंतर श्वेताने 2013 मध्ये अभिनव कोहलीसोबत लग्न केले, पण हे लग्नही फार काळ टिकले नाही आणि 2016 मध्ये दोघांचा घटस्फोट झाला. श्वेताला अभिनवपासून एक मुलगा रेयांश देखील आहे. त्याच वेळी, श्वेताला राजा चौधरीपासून एक मुलगी पलक आहे.



# "मी त्या व्यक्तींबरोबर कधीही काम करणार नाही, जे..." प्रियांका चोप्रा स्पष्टच बोलली



बॉलिवूडसह हॉलिवूड गाजवणारी अभिनेत्री म्हणून प्रियांका चोप्राला ओळखले जाते. काही दिवसांपूर्वी प्रियांका ही भारतात परतली. त्यानंतर तिने 'नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्र' च्या उद्घाटन सोहळ्याला हजेरी लावली. तर दुसरीकडे प्रियांका ही तिच्या आगामी 'सिटाडेल' या चित्रपटाचे प्रमोशन करताना दिसत आहे. नुकतंच प्रियांकाने एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या कामाच्या पद्धतीबद्दल सांगितले. तसेच ती तिच्या कामाचे निकष कसे ठरवते याबद्दलही तिने भाष्य केले. प्रियांकाने नुकतंच तिचा सहकलाकार रिचर्ड मेडनबरोबर एका पत्रकार परिषदेला हजेरी लावली. यावेळी तिला सिनेसृष्टीबद्दल, तिच्या कामाबद्दल प्रश्न विचारण्यात आले. त्यावर तिने मनमोकळेपणाने भाष्य केले.गेल्या काही वर्षात माझे काम करण्याचे, चित्रपट निवडण्याचे निकष बदलले आहेत. कोणत्या प्रोजेक्टमध्ये काम करत असताना मी एका गोष्टीशी कधीही तडजोड करु शकत नाही आणि ती म्हणजे मला न आवडणाऱ्या व्यक्ती. मी माझ्या नावडत्या व्यक्तींबरोबर कधीही काम करु शकत नाही. माझ्यासाठी ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे", असे प्रियांका म्हणाली. "मला माझ्या आजूबाजूला असणाऱ्यांचे कौतुक करायला आवडते. मी हे फार उत्साहाने करते. मला कामावर जाण्यासाठी प्रेरणा देणारी लोक आवडतात.

# चेन्नईची लखनऊवर मात!



## ऋतुराज, मोईनची चमक

**31 चेंडूत 57 धावा**

। चेन्नई, । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सलामीवीर ऋतुराज गायकवाडच्या (31 चेंडूंत 57 धावा) अर्धशतकानंतर मोईन अलीच्या (26 धावांत 4 बळी) प्रभावी माऱ्याच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्जने इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सवर 12 धावांनी विजय मिळवला.**



चेन्नईने दिलेल्या 218 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या लखनऊनेही चांगला प्रारंभ केला. सलामीवीर काएल मेयर्सने (22 चेंडूत 53 धावा) आक्रमक खेळी केली. कर्णधार केएल राहुल (20) आणि मेयर्सने पहिल्या गडयासाठी 79 धावांची भागिदारी रचली. मेयर्सला मोईन अलीने बाद केले. यानंतर दीपक हुडाच्या (2) रुपात संघाला दुसरा धक्का बसला. मग. राहुल, कृणाल पंडया (9) आणि मार्कस स्टोइनिसला (21) मोईनने बाद करत चेन्नईची अवस्था 5 बाद 130 अशी बिकट केली. निकोलस पूरनने (32) काही आक्रमक फटके मारले. अखेरीस आयुष बदोनी (23) आणि कृष्णप्पा गौतम (नाबाद 17) यांनी धावा केल्या. मात्र, त्यांची मेहनत अपुरी पडली.वूडने अखेरीस येऊन एक चौकार व एक षटकार मारले मात्र, संघाला त्याचा काही फायदा झाला नाही. त्यामुळे लखनऊला 20 षटकांत 7 बाद 205 धावा करता आल्या. चेन्नईकडून मोईनला तुषार देशपांडेची (2/45) साथ मिळाली.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजीस उतरलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाने आक्रमक सुरुवात केली. पहिल्या सामन्यात आक्रमक खेळी करणाऱ्या ऋतुराजने या सामन्यातही आपली ही लय कायम राखली. त्याला कॉन्वेचीही साथ मिळाली. दोघांनी पहिल्या गडयासाठी 110 धावांची भागिदारी रचली. ऋतुराजने आपल्या खेळीत 3 चौकार व 4 षटकार मारले. रवी बश्नोईने ऋतुराजला बाद करत ही भागिदारी मोडीत काढली. कॉन्वेही बाद झाल्यानंतर शिवम दुबे (27), अंबाती रायुडू (नाबाद 27) आणि मोईन अली (19) यांनी फटकेबाजी करत चेन्नईची धावसंख्या 20 षटकांत 7 बाद 217 पर्यंत पोहोचवली. लखनऊकडून बिश्नोई (3/28) आणि वेगवान गोलंदाज मार्क वूड (3/49) यांनी चांगली गोलंदाजी केली.

### संक्षिप्त धावफलक

» चेन्नई सुपर किंग्ज : 20 षटकांत 7 बाद 217 (ऋतुराज गायकवाड 57, डेव्हॉन कॉन्वे 47, अंबाती रायुडू नाबाद 27; रवी बिश्नोई 3/28, मार्क वूड 3/49) विजयी वि. लखनऊ सुपर जायंट्स : 20 षटकांत 7 बाद 205 (काएल मेयर्स 53, निकोलस पूरन 32; मोईन अली 4/26, तुषार देशपांडे 2/45)

### पहिल्या सामन्यात आक्रमक खेळी

**» प्रथम फलंदाजीस उतरलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाने आक्रमक सुरुवात केली. पहिल्या सामन्यात आक्रमक खेळी करणाऱ्या ऋतुराजने या सामन्यातही आपली ही लय कायम राखली. त्याला कॉन्वेचीही साथ मिळाली. दोघांनी पहिल्या गडयासाठी 110 धावांची भागिदारी रचली. ऋतुराजने आपल्या खेळीत 3 चौकार व 4 षटकार मारले. रवी बश्नोईने ऋतुराजला बाद करत ही भागिदारी मोडीत काढली.**

# गुजरातचा सलग दुसरा विजय!

## साई सुदर्शनच्या खेळीच्या जोरावर दिल्लीचा 6 विकेट्सने उडवला

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपि: आयपीएलच्या १६व्या हंगामातील सातव्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने आले होते. दोन्ही संघांमधील हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ६ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर गुजरात सलग दुसरा विजय मिळवत गुणतालिकेत अव्वलस्थान काबीज केले. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीन गुजरातला १६३ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात गुजरातने १८.१ षटकांत लक्ष्य पूर्ण केले.**

१६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, वृध्दिमान साहा आणि शुबमन गिल या जोडीला या सामन्यात चांगली सुरुवात करता आली नाही. २२ धावांवर गुजरातच्या संघाला पहिला धक्का रिद्धिमान साहाच्या रूपाने बसला, जो एनरिक नोरखियाच्या चेंडूवर १४ धावा करून बाद झाला. यानंतर ३६ धावांवर गुजरात संघाला शुबमन गिलच्या रूपाने आणखी एक धक्का बसला, तर ५४ धावांवर संघाने हार्दिक पांड्याची विकेटही गमावली.साई सुदर्शनने अर्धशतकी खेळी खेळली, मिलरने आपली किलर स्टाईल दाखवली –

पहिल्या ६ षटकांत ३ महत्त्वपूर्ण विकेट्स गमावल्यानंतर, गुजरात टायटन्स संघाचा डाव साई सुदर्शन आणि विजय शंकर यांनी सांभाळला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५३ धावांची शानदार भागीदारी करून संघाला विजयापर्यंत नेण्याचे काम केले. या सामन्यात २३ चेंडूत २९ धावा करून विजय शंकर पॅव्हेलियनमध्ये परतला.

साई सुदर्शनने या सामन्यात ४८ चेंडूत ६२ धावांची शानदार नाबाद खेळी केली, तर डेव्हिड मिलरने १६चेंडूत ३१ धावांची नाबाद खेळी पाहायला मिळाली. दिल्लीकडून या सामन्यात नॉर्खियाने २ तर मिचेल मार्श आणि खलील अहमद यांनी १-१ विकेट घेतल्या. या मोसमातील गुजरातचा हा सलग दुसरा विजय आहे. गेल्या



सामन्यात त्याने चेन्नई सुपर किंग्जचा पराभव केला होता. त्याचवेळी दिल्ली कॅपिटल्सचा हा दुसरा पराभव आहे. गेल्या सामन्यात लखनऊ सुपरजायंट्सविरुद्ध दिल्लीला पराभवाचा सामना करावा लागला होता. दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ गडी गमावून १६२ धावा केल्या होत्या. दिल्लीकडून कर्णधार डेव्हिड वॉर्नरने ३२ चेंडूत ३७ तर उपकर्णधार अक्षर पटेलने २२ चेंडूत ३६ धावा केल्या. सरफराज खान ३० आणि अभिषेक पोरेलने २० धावा करून बाद झाले. दिल्ली कपिटल्सचे १० पैकी फक्त चार फलंदाज दुहेरी आकडा पार करू शकले. गुजरात टायटन्ससाठी मोहम्मद शमी आणि राशिद खान यांनी घातक गोलंदाजी केली. दोघांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. अल्झारी जोसेफला दोन विकेट मिळाल्या.

# बुलढाण्यात राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

। बुलढाणा। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जिल्ह्यात फिडे नामांकन राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. येत्या १४ ते १६ एप्रिल दरम्यान स्थानीय सहकार विद्या मंदिराच्या सुसज्ज सभागृहात ही स्पर्धा पार पडणार आहे.

ही स्पर्धा आयोजित करण्याचे आव्हान बुलढाणा अर्बन पतसंस्था, त्यांच्या अखत्यारीतील सहकार विद्या मंदिराने स्वीकारले आहे. बुलढाणा जिल्हा चेस सर्कलसह अ.भा. बुद्धिबळ फेडरेशन, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे सहकार्य लाभणार आहे. बुद्धीच्या खेळातील दोन ग्रँडमास्टर उपस्थित राहून आयोजनासाठी मार्गदर्शन करणार आहे. बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी संचालक तथा आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. स्थानीय बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी मध्ये प्रसिद्धी माध्यमाशी संवाद साधताना डॉ. झंवर यांनी स्पर्धेचा तपशील सांगितला.

